# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों. क्र. ४९८२/१९/अ.क्र. २५८९/२०/०१

**श्री. मेहमूद मेहबूब शेख**
रुम नं. ७, दोस्त मोहम्मद चाळ,
गौसीया मस्जिद मागे, नित्यानंद नगर,
घाटकोपर (प) मुंबई – ४०० ०८६.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (प.ज.वा.) पू.उ. एल विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका उप प्रमुख अभियंता (प.ज.वा.) पूर्व उपनगरे यांचे कार्यालय,
पंतनगर गॅरेज इमारत, पंतनगर आगाराच्या मागे, पंतनगर,
४ था मजला, घाटकोपर (पू), मुंबई ४०००७५.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प.ज.वा.) पू.उ. परि.५**
बृहन्मुंबई महानगरपालिका उप प्रमुख अभियंता (प.ज.वा.) पूर्व उपनगरे यांचे कार्यालय,
पंतनगर गॅरेज इमारत, पंतनगर आगाराच्या मागे, पंतनगर,
४ था मजला, घाटकोपर (पू), मुंबई ४०००७५.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक: १४.०१.२०२१**

अपीलकर्ता : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिलाचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १२.०६.२०१९ | २४.०७.२०१९ | २३.०७.२०१९ | - |

अपीलकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम-६(१)अन्वये दि. १२.०६.२०१९ रोजी जन माहिती अधिकाऱ्याकडे माहिती अर्ज सादर केला. सदर अर्जान्वये त्यांनी, “Work of ES 221” याबाबत सविस्तर माहिती/छायांकित कागदपत्रांची मागणी केलेली होती.

अपीलकर्त्याने आयोगाकडे दि. १०.१०.२०१९ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले असून त्याद्वारे असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४.०७.२०१९ रोजी उत्तर देण्यात आले की, अपिलकर्ता यांना हव्या असलेल्या माहितीच्या छायांकित प्रतीचे रुपये २१०/- शुल्क जमा केल्यानंतर त्यांना माहिती देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश धारिकेमध्ये दिसून येत नाही.

दृकश्राव्य माध्यमाद्वारे व्दितीय अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी अपिलकर्त्यांने विशद केले की, त्यांनी दिनांक २२.०९.२०२० रोजी माहितीसाठी रुपये २१०/- शुल्क जमा केले पण त्यांना माहिती प्राप्त झालेली आहे.

जन माहिती अधिकारी श्री. बाळाराम राठोड, सहाय्यक अभियंता (प.ज.वा.) पू.उ. एल विभाग यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, अपिलकर्ता यांना संपूर्ण माहिती ७ दिवसात स्पीड पोस्टाने निःशुल्क पाठविण्यात यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

**(सुमित मल्लिक)**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १४.०१.२०२१**

प्रशंसा १४.०१.२०२१